# स्वच्छता पंधरवडा "स्वच्छता ही सेवा 2023 " उपक्रमाचा अहवाल

**दिनांक १७ सप्टेंबर २०२३ ते २ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत "स्वच्छ भारत अभियान"या** केंद्र शासन निर्देशित व पनवेल महानगरपालिका यांच्या **संदर्भ**:जा.क्र.पमपा/घकवि/२५२३/प्र.क्र.३१०/८५८/२०२३ दिनांक:२६/९/२०२३चे पनवेल महानगरपालिकेचे आवाहन पत्र. यानुसार शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे **"स्वच्छता पंधरवडा-स्वच्छता ही सेवा २०२३"** उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.सदरील कालावधीत महाविद्यालयात पुढील उपक्रम नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आले.

**१) "स्वच्छता रॅली"उपक्रम (दिनांक:१७ सप्टेंबर २०२३):**

केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे **स्वच्छ भारत अभियानाची** पनवेल महापालिका हद्दीमध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू करण्यात आली. सद्यस्थितीमध्ये केंद्र शासनामार्फत **स्वच्छता पंधरवडा दिनांक १७/९/२०२३ ते२/१०/२०२३ या कालावधीमध्ये** राबविण्यात आला असून सदर उपक्रमांतर्गत. " इंडियन स्वच्छता लीग २०" या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. कचरा मुक्त शहर होणे कामी सदर मोहिमेमध्ये **महाविद्यालयातील शिक्षक -प्रशिक्षणार्थी सहभागी होणे अपेक्षित होते.**याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून दिनांक १७/९/२०२३ रोजी सकाळी ७.३० ते १०.०० वाजता स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीमध्ये आमच्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षक -प्रशिक्षणार्थी यांनी सहभाग दर्शविला.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक -प्रशिक्षणार्थी आणि पनवेल मधील शाळा महाविद्यालयाचे विद्यार्थी पनवेल महापालिका मुख्यालयाच्या ठिकाणी ७.३० वाजता हजर झाले. सर्वांनी स्वच्छतेची शपथ घेतली. पनवेलचे आमदार मा. प्रशांत ठाकूर यांनी पनवेल स्वच्छते संबंधीचे आवाहन केले व रॅलीची सुरुवात केली . **पनवेल महानगरपालिका मुख्यालय ते वडाळे तलाव पनवेल अशी रॅली काढण्यात आली.** स्वच्छतेसंबंधीच्या घोषणा देत रॅली वडाळा तलाव या ठिकाणी पोहोचली. पनवेल महानगरपालिकेचे **आयुक्त मा.गणेश देशमुख** यांनी रॅलीतील सर्व सहभागींचे अभिनंदन करून प्रमाणपत्रांचे वितरण केले. पनवेल महानगरपालिका स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने स्वच्छतेचा ध्यास घ्यावा असे त्यांनी आपल्या भाषणातून सर्वांसाठी आवाहन केले. राष्ट्रगीताने रॅलीचा समारोप करण्यात आला.

विद्यार्थी हा देशाचे भविष्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीमध्ये बदल घडविण्यातसाठी अशा स्वच्छता रॅलीच्या आयोजनाचे शिक्षक-प्रशिक्षणार्थ्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य मा .डॉ.रमा भोसले यांनी प्राध्यापक व शिक्षक-प्रशिक्षणार्थी यांच्या रॅलीमधील सहभागाबाबत कौतुक केले. सदरील रॅलीमधील सहभागाचे नियोजन-आयोजन महाविद्यालयाचे समाजकार्य विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ.बी.जी.खाडे यांनी केले.

**२) महाविद्यालय सजावट उपक्रम:**

दिनांक १७/९/२०२३ ते ०२/१०/२०२३ या कालावधीत दररोज एक तास मेहनत करून प्राचार्यांच्या प्रेरणेने सर्व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक- प्रशिक्षणार्थींनी महाविद्यालयातील ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, सरस्वती सभागृह, क्रीडा व जिमखाना विभाग तसेच इतर सर्व विभागांची आणि सर्व वर्ग खोल्यांची स्वच्छता व सजावट केली. विविध शैक्षणिक साधने तयार केली. या उपक्रमामुळे प्रशिक्षणार्थ्यांना आपल्या शाळेची स्वच्छता व सजावट कशी करावी याचे प्रशिक्षण प्राप्त झाले. श्रम प्रतिष्ठा, सौंदर्यदृष्टी आणि व्यवसाय निष्ठा या मूल्यांची रुजवणूक होण्यास या उपक्रमामुळे मदत झाली

३) **"एक तारीख एक घडाळी तास स्वच्छता उपक्रम"**

महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून **दिनांक ०१ ऑक्टोबर 2023 रोजी सकाळी ठीक १०.०० ते १२.०० या वेळेत "एक तारीख-एक घड्याळी तास" हा स्वच्छता उपक्रम** मोठ्या उत्साहात घेण्यात आला. सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमा भोसले, उपक्रम प्रभारी प्राध्यापक डॉ.बीजी.खाडे आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व सर्व शिक्षक- प्रशिक्षणार्थी महाविद्यालयात उपस्थित होते. मा. प्राचार्यांच्या प्रेरणेने व सर्व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक-प्रशिक्षणार्थ्यांनी दोन तास मेहनत करून गटांनुसार देण्यात आलेला महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ व सुंदर केला. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील प्राचार्य , पाच प्राध्यापक व ४५ शिक्षक - प्रशिक्षणार्थींनी सहभागी होऊन श्रमदानाचा आनंद घेतला. या उपक्रमामुळे शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या ठिकाणी श्रमप्रतिष्ठा व पर्यावरण संरक्षण या मूल्याची रुजवणूक होण्यास मदत झाली.

**४) महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त स्वच्छता मोहीम**

दिनांक ०२ ऑक्टोबर २०२३ रोजी ११.०० वाजता महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती कार्यक्रम घेण्यात आला. मा.प्राचार्य डॉ.रमा भोसले व सर्व प्राध्यापकांच्या यांच्या हस्ते सरस्वती पूजन व प्रतिमा पूजन केले . शिक्षक प्रशिक्षणार्थींची भाषणे झाली..

११.३० ते १.४५ या वेळेत महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.व स्वच्छता पंधरवड्याचा समारोप करण्यात आला.सदर विभाग प्राध्यापक डॉ.बी.जी.खाडे यांनी सांभाळला.

पनवेल महानगरपालिका आयोजित " इंडियन स्वच्छता लीग २.०" मधील रॅली मधील प्राध्यापक व शिक्षक प्रशिक्षणातील यांच्या सक्रिय सहभागाची क्षणचित्रे .(रविवार दिनांक:17/9/2023)








**दिनांक ०१/१०/२०२४ “एक तारीख एक घडाळी तास स्वच्छता उपक्रम” क्षणचित्रे**




**मा.प्राचार्य डॉ.रमा भोसले व प्रभारी प्राध्यापक डॉ.बी.जी.खाडे प्रशिक्षणार्थ्यांना संबोधित करताना**




**शिक्षक-** प्रशिक्षण महाविद्यालयाची **सजावट करतानाची क्षणचित्रे**






**२ ऑक्टोबर २०२३ महाविद्यालय परिसर सफाई**



स्वच्छ सर्वेक्षण 2023

SWACHHATA KE DO RANG

SAFAIMITRA SURAKSHA CHALLENGE

पनवेल महानगरपालिका

स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका

## स्वच्छता सन्मानपत्र

केंद्र शासनाच्या "स्वच्छ सर्वेक्षण २०२३" अंतर्गत "स्वच्छ वॉर्ड" स्पर्धे मध्ये

या सदरामध्ये स्वच्छता विषयक उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल जि. रायगड

यांना पनवेल महानगर पालिके मार्फत सन्मानित करण्यात येत आहे. स्वच्छतेच्या बाबतीत असेच सातत्य राखावे हीच अपेक्षा.

(श्री. सचिन पवार)
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

(श्री. गणेश देशमुख)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका